भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :- बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०१८

<u>वाचा</u>- १. शासन निर्णय क्रमांक :- बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.६/१/२०१७
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.१६/११/२०१७
३. शासन पुरक पत्र क्रमांक :- बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.०२/१२/२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

मागासवर्गीय मुलामुलींसाठी राज्यात ४४१ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून, त्यापैकी मुलांची २३४, मुलींची २०७ वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतीगृहांपैकी २२४ वसतिगृहे शासकीय इमारतीमध्ये असून, २१७ भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. मुलांच्या वसतिगृहाची मान्य संख्या २१६६० असून, मुलींच्या वसतिगृहाची मान्य संख्या १९८६० आहे. मुलां-मुलींच्या एकुण ४४१ वसतीगृहांची मान्य विद्यार्थी संख्या ४१५२० आहे.

राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेली व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वाढत असलेली संख्या यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह सुविधेचा जागेची मर्यादा लक्षात घेता लाभ देणे शक्य होत नाही. पर्यायाने मोठया प्रमाणात विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहतात. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासास मर्यादा येत आहेत.

शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ वसतिगृह सुरु करुन तेथे प्रवेश देणे यासाठी जागेची उपलब्धता व बांधकामासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मर्यादा आहेत. सबब, मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतीगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरीता शासनाने

दि.६ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे.

या योजने अंतर्गत सन २०१६-१७ साठी १५००० विदयार्थ्यांचे तर सन २०१७-१८ साठी २५,००० विदयार्थ्यांचे उद्दिष्ठ निश्चित केलेले असतांना, सन २०१६-१७ मध्ये केवळ ३२५५ पात्र विदयार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता आलेला आहे. सन २०१७-१८ करीता आजपर्यंत केवळ १०,८२८ इतके अर्ज प्राप्त झालेले असून, त्यापैकी केवळ १६७९ विदयार्थी या योजनेकरीता पात्र ठरलेले आहेत. सदर योजना राबवितांना वारंवार अडचणी उद्भवत असल्याने प्रस्तुत योजना प्रभावीपणे राबविता यावी व योजनेचे दरवर्षीचे उद्दीष्ट पुर्ण करता यावे, याकरीता या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही सुधारणा करुन सर्वसमावेश शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सबब या योजनेसंदर्भातील दि.६ जानेवारी २०१७ चा शासन निर्णय, दि.१६ नोव्हेबर २०१७ चे शुध्दीपत्रक तसेच दि.२.१२.२०१७ चे पुरकपत्र अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय:-

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेणे वा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणे हे पर्याय विदयार्थ्यांकडे उपलब्ध असतील. शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतीगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरांवरील महाविद्यालयांत/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे **भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता, व इतर आवश्यक सुविधा** स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्हयाच्या ठीकाणी तसेच महानगर पालीकेच्या हद्दीपासून ५ कि.मी.परिसरात असलेली महाविदयालये/ शैक्षणिक संस्था या ठीकाणी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० |
| ४ | प्रति विदयार्थी एकुण देय रक्कम | ६०,००० | ५१,००० | ४३,००० |

* टीप:-उपरोक्त रक्कमेव्यतिरिक्त वैदयकीय व अभियांत्रिकी शाखेतील विदयार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.५,०००/- व अन्य शाखेतील विदयार्थ्यांना प्रतिवर्ष रु.२०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.

२. **या योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष खालीलप्रमाणे असतील :-**

- विदयार्थी शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा
- शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास विदयार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा.
- या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसुचित जाती व नवबौध्द या प्रवर्गाचा असावा.
- विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
- या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज केलल्या व प्रवेश न मिळालेल्या अनु.जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.
- विद्यार्थ्याने स्वत: चा आधार क्रमांक त्याने ज्या राष्ट्रीयकृत / शेडयूल्ड बॅकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.
- विदयार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाखा लाखापेक्षा जास्त नसावे तसेच केंद्र शासनामार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल त्यानुसार या योजनेसाठी पालकाची उत्पन्न वार्षिक मर्यादा त्या-त्या प्रमाणे लागू राहील.

- विद्यार्थी स्थानिक नसावा (ज्या महाविदयालय/शैक्षणिक संस्थेत विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे तो विद्यार्थी ते महाविदयालय/शैक्षणिक संस्था ज्या महानगर पालीका/ नगर पालीका/ग्रामपंचायत/ कटक मंडळे यांच्या हद्दीत आहेत त्या महानगर पालीका/ नगर पालीका/ग्रामपंचायत/ कटक मंडळे येथील रहीवासी नसावा.)
- महानगर पालिकेच्या हद्दीपासुन ०५ की.मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात/शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थीसुध्दा या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.
- विदयार्थी इयत्ता ११ वी,१२ वी आणि त्यानंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा.
- ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांस १० वी मध्ये किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य आहे.
- १२ वी मध्ये विदयार्थ्यास किमान ५० टक्के गुण असल्यावर या योजनेचा पुढे पदवी/ पदव्युत्तर शिक्षणाकरीता लाभ घेता येईल.
- पदवी,पदवीका,दोन वर्षापेक्षा कमी नसणाऱ्या कोणत्याही मान्यताप्राप्त अभ्यासक्रमास सदर विदयार्थ्यांस पुढे लाभ घेण्याकरीता किमान ५० टक्के गुण किंवा त्याप्रमाणात ग्रेडेशन/CGPA असणे आवश्यक राहिल.
- १२ वी नंतर पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षापेक्षा कमी नसावा. तसेच पदवीनंतर पदव्युत्तर पदवी / पदवीका अभ्यासक्रमाचा कालावधीही दोन वर्षापेक्षा कमी नसावा. (संबंधित अभ्याक्रम शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी अनुज्ञेय असावा.)
- विदयार्थ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.
- या योजनेमध्ये दिव्यांग (अनु.जाती व नवबौध्द घटकातील) विदयार्थ्यांना ३ टक्के आरक्षण असेल. दिव्यांग (अनु.जाती व नवबौध्द घटकातील) विदयार्थ्यासाठी गुणवत्तेची टक्केवारी ४० टक्के इतकी राहील. व त्यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- **या योजनेसाठी खासबाब सवलत लागू राहणार नाही**

<u>अनुदान वितरण</u> :-

- या योजनेचा लाभ घेण्यासाठी विदयार्थी ज्या जिल्हयामध्ये शिकत आहे त्या जिल्हयाच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे त्या विदयार्थ्यांनी अर्ज करावा. त्यानुसार त्याच जिल्हयाचे सबंधित सहायक आयुक्त हे विदयार्थ्यांची निवड करतील आणि पात्र लाभार्थ्यांस जवळचे मागासवर्गीय मुला-मुलींचे वसतीगृहांचे गृहपाल यांचेशी संलग्न (Attach) करतील.
- सन २०१७-१८ या वर्षा करिता तथा त्यापुढील वर्षाकरीता विद्यार्थ्यांचे प्राप्त झालेले अर्ज, विदयार्थी ज्या जिल्हयामध्ये शिकत आहे त्या जिल्हयाच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे पाठवावेत व त्यानुसार त्या सहायक आयुक्तांनी संबंधित विदयार्थ्यास अनुज्ञेय रक्कम अदा करावी
- विद्यार्थ्याचा प्रवेश ज्या वसतीगृहाशी सलंग्न करण्यात येईल त्या वसतीगृहाच्या गृहपालाने सादर केलेल्या उपस्थितीच्या आधारे संबंधीत सहायक आयुक्त प्रत्येक सहामाहीस अनुज्ञेय रक्कम संबधित विद्यार्थ्याच्या आधार सलंग्न बॅक खात्यामध्ये जमा करतील.

- शैक्षणीक वर्षामध्ये विद्यार्थ्याने संबंधित शैक्षणीक संस्थेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदर योजनेअंतर्गत अनुज्ञेय रक्कमेपैकी पहिल्या सहामाहीची रक्कम आगाऊ देण्यात येईल.
- या योजनेअंतर्गत लाभास पात्र असलेल्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्ती अंतर्गत प्राप्त होत असलेल्या निर्वाह भत्याची रक्कम वजावट करून, उर्वरीत निर्वाह भत्ता, भोजन भत्ता, निवास भत्ता, याची रक्कम अदा करण्यात येईल.
- विद्यार्थ्याची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ टक्के आवश्यक राहील याबाबत संबंधित संस्थेचे प्रत्येक सहामाहीस उपस्थिती प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
- **या योजनेकरिता सहायक आयुक्त,समाजकल्याण यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषीत करण्यात येत आहे.**

<u>संनियत्रण</u> .

- आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण यांना त्याच्या विभागाचे उद्दीष्ट ठरवुन द्यावे. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांनी अर्जाच्या उपलब्धतेनुसार त्यांच्या विभागातील सहायक आयुक्त समाजकल्याण यांना उद्दीष्ट ठरवुन द्यावे. प्रादेशिक विभागाअंतर्गत उद्दीष्ट कमी-जास्त करण्याचे अधिकार प्रादेशिक उपायुक्तांना असतील. संबंधीत प्रादेशीक उपायुक्त यांना देण्यात आलेले उद्दीष्ट जर पुर्ण होत नसेल तर ते उद्दीष्ट इतर विभागांना वाटप करण्याचे अधिकार आयुक्त, समाजकल्याण पुणे यांना राहतील.
- सदर योजनेवर सहायक आयुक्त, समाजकल्याण तसेच संबंधित वसतीगृहाचे गृहपाल यांचे संनियंत्रण राहील
- विद्यार्थ्यास ११ व १२ वी करिता प्रतिवर्षी किमान ५० टक्के गुण ( अनु.जाती व नवबौध्द घटकातील दिव्यांगासाठी ४० टक्के) घेवुन उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. तसेच पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रतीवर्षी किमान ५० टक्के गुण (अनु.जाती व नवबौध्द घटकातील दिव्यांगासाठी ४० टक्के) घेवुन उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. असे असले तरी सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या ज्या विदयार्थ्यांना पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी हे शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण करतांना एटीकेटी प्राप्त झाली त्या विदयार्थ्याला फक्त एकदाच या अटीतून सुट देण्यात येईल.(म्हणजेच एखादया विदयार्थ्यास दुसऱ्यावेळेस एटीकेटी मिळाल्यास तो सदर योजनेचा पुढील लाभ घेण्यास अपात्र ठरेल.)
- विद्यार्थ्याने प्रत्येक सत्र परिक्षेचा निकाल १५ दिवसाचे आत संबधित गृहपालांना सादर करणे बंधनकारक असेल.
- विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ सर्व पात्र अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी (इयत्ता ११ व १२ सहीत) जास्तीत जास्त ७ वर्ष अनुज्ञेय असेल. परंतु इंजीनिअरिंग / वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी (इयत्ता ११ व १२ सहीत) सदर योजनेचा लाभ हा ८ वर्ष अनुज्ञेय असेल.
- विद्यार्थ्याने खोटी माहिती अथवा कागदपत्रे देवुन लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास किंवा शैक्षणीक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेवुन

गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास तो कार्यवाहीस पात्र राहिल. तसेच त्यास दिलेल्या रकमेची १२ टक्के व्याजासह वसुली केली जाईल.

- या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी योजनेची महाविद्यालयीन स्तरापर्यंत प्रसिध्दी करावी व त्या बाबीवरील खर्च प्रती वर्ष, प्रती जिल्हा रु. ३ लक्ष मर्यादेपर्यंत संबंधित सहायक आयुक्तांनी करावा व हा खर्च योजनेच्या मंजुर तरतुदीतुन भागवावा.
- या योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण, प्रादेशिक आयुक्त, समाजकल्याण, सहायक आयुक्त,समाजकल्याण तसेच गृहपाल यांची राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६१३१७२१०३९७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.06.14 10:30:30 +05'30'

( दि.रा. डिंगळे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मंत्रालय मुंबई
७. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
८. महालेखापाल (महाराष्ट्र -१/२), (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१०. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण.
११. शिक्षण-२ संग्रहार्थ.

सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अर्ज तपासणी पत्रक २०१७-१८

विद्यार्थ्यांचे नाव :- ____________________

प्रवर्ग / जात :- ____________________

महाविद्यालयाचे नाव :- ____________________

| अ.क्र. | प्रकरणासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा तपशील | ✓/ ✗ |
|---|---|---|
| | प्रपत्र अ | |
| १ | जातीचा दाखला (SC प्रवर्गातील) | |
| २ | महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा (वय/अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र/रेशनकार्ड/निवडणूक ओळखपत्र/जन्म तारखेचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक) | |
| ३ | तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा वडील नोकरीत असल्यास फॉर्म नंबर १६. विद्यार्थीनी विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा (२.५ लक्ष) | |
| ४ | इ. १० वी, १२ वी किंवा पदवी परिक्षेचे गुणपत्रक (किमान ५०% गुण आवश्यक) | |
| ५ | विद्यार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र | |
| ६ | स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ७ | विद्यार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा. (खाजगी वसतिगृह, भाडे करारनामा इ.) | |
| ८ | महाविद्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र (किमान ७५%) ★ | |
| ९ | महानगरपालिका/ जिल्ह्याचे ठिकाणपासून महाविद्यालय २० कि.मी. च्या आत असावे. ५ | |
| १० | महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र | |
| ११ | सत्र परिक्षेच्या निकालाची प्रत (किमान ५०% गुण आवश्यक) ★ | |
| १२ | अभ्यासक्रमाचा कालावधी (किमान २ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक) १२ वी, पदवी, पदव्युत्तर नंतरचा डिप्लोमा (यांनाही देय आहे.) | |

प्रपत्र ब

| | | |
|---|---|---|
| १३ | आधार कार्डची प्रत | |
| १४ | विद्यार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (३% राखीव) ✓ | |
| १५ | बँकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणून पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बँक स्टेटमेंटची प्रत किंवा रद्द केलेला चेक | |
| १६ | बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | |
| १७ | नोकरी व्यवसाय करित नसलेबाबतचा पुरावा /उल्लेख | |
| १८ | आई-वडिलांसोबत राहत नसल्याबाबतचे प्रपत्र ३ (घोषणापत्र ) | |

खालील मुद्दा अ व ब यापैकी जे लागू आहे तेथे ✓ अशी व लागू नसल्यास ✗ अशी खूण करावी.

१ ) उपरोक्त तक्त्यातील क्र ______________________ मधील कागदपत्रे उपलब्ध नसल्याने सदर विद्यार्थी स्वाधार योजनेस पात्र नाही ☐

२ ) सदर प्रकरणात वरील सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध आहेत करीता सदर विद्यार्थी स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहे. ☐

स्वाक्षरी :-

तपासणी करणाऱ्याचे नाव :-

पदनाम :-

शिक्का (असल्यास)

शाखा प्रमुख / समाज कल्याण निरिक्षक

विशेष अधिकारी

सहायक आयुक्त, समाज कल्याण पुणे

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनासाठी सन 2018-19 वर्षाकरिता अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्याने करावयाच्या अर्जाचा नमुना

अर्ज दाराचा फोटो

**आवेदनपत्र भरण्यापुर्वी ते काळजीपुर्वक वाचुन भरावे**

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | | |
|---|---|---|---|
| आवेदनपत्र आवक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | गुण | टक्केवारी |
| | | एकूण गुण .................<br>मिळालेले गुण ............. | |

प्रति,
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, ...............................

महोदय / महोदया

मी **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा** लाभ मिळणेसाठी माझे आवेदन पत्र सादर करीत आहे. आवदेनपत्रात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे. मी सदर योजनेच्या सर्व अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या असून त्या मला अवगत झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळाल्यास मी सदर योजनेसाठी लागु असलेल्या नियमांचे /अटींचे कसोशिने पालन करीन अशी मी हमी देत आहे.

मी खोटी माहिती व कागदपत्रे देऊन लाभ घेतल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास मी कारवाईस पात्र राहील. तसेच सदर योजनेअंतर्गत मला मिळालेली रक्कम (१२टक्के) व्याजासह शासनास परत करेन याची मला जाणीव आहे.

स्थळ :- आपला/आपली विश्वासू

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी)

अर्जदाराचे नांव ...............................
मोबाईल क्रमांक ..............................
आधार क्रमांक .................................



Govindzadkepatil/desktop.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना

| | |
|---|---|
| **अर्जदाराची माहिती:** | |
| अ) १) अर्जदार विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव :- आडनाव ........................स्वत:चे नांव .......................... वडिलांचे नांव............... | |
| २) वडिलांचे पुर्ण नाव :- आडनाव ................स्वत:चे नांव ............... वडिलांचे नांव............... | |
| ३) अर्जदार विद्यार्थीनी विवाहीत असेल तर पतीचे नाव व पत्ता:- | |
| ४) आईचे पुर्ण नाव: - | |
| ५) जात व प्रवर्ग:- | |
| ६) (i) अर्जदाराचे मुळ राहण्याचे ठिकाण व पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता (पिनकोडसह) | घर क्रमांक ............. रस्ता/ गल्ली .............................<br>जवळची खूण .................. गाव/शहर .......................<br>तालुका .................... जिल्हा ................................<br>पिन क्रमांक ................................ |
| (ii) उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांनी दिलेला रहिवासी दाखला | प्रमाणपत्र क्रमांक ............... दिनांक .........................<br>कार्यालयाचे नाव ................................................... |
| ७) अर्जदाराचा मोबाईल क्रमांक<br>असल्यास दूरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) | ..........................................<br>.......................................... |
| ८) अर्जदार दिव्यांग आहे काय?<br>दिव्यांगत्वाचा प्रकार<br>टककेवारी | .......................................<br>.......................................<br>....................................... |
| **ब) जातीच्या दाखल्याचा तपशिल :-** | |
| (i) अर्जदाराने ज्या जिल्ह्यातून जातीचा दाखला काढला आहे त्या जिल्ह्याचे नांव.<br>(ii) अनु.जाती व नवबौध्द असल्याबाबतचे उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रातील माहिती | .....................................<br>प्रमाणपत्र क्रमांक ............ जारी केल्याचा दिनांक .........<br>जात ............................गांव ................................<br>तालुका ......................... जिल्हा ........................... |
| **क) आधार कार्डाचा तपशिल :-** | |
| (i) अर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक | |
| (ii) आधारकार्डावरील पत्ता | |

| | |
|---|---|
| **ड) बँकेचा तपशिल :-** | |
| (१) राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड बॅकेचे नांव | |
| (२) शाखा | |
| (३) खाते क्रमांक | |
| (४) I.F.S.C. कोड | |
| (५) बॅक खाते आधारकार्डाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | |
| **इ) प्रवेशित महाविद्यालयाची माहिती :-** | |
| १) ज्या महाविद्यालयात अर्जदाराने प्रवेश घेतलेला आहे त्या महाविद्यालयाचे नांव | |
| २) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ३) महाविद्यालयाने विद्यार्थ्यास दिलेला प्रवेश नोंदणी क्रमांक/ सर्वसाधारण नोंदवहीतील नोंद क्रमांक/ ओळखपत्र क्रमांक | |
| **फ) प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती :-** | |
| १) अभ्यासक्रमाचे नाव | |
| २) प्रवेशित वर्ष | (पहिले/ दुसरे/ तिसरे/ चौथे/ पाचवे) |
| ३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| ४) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| ५) अभ्यासक्रम- पदवी/पदविका/ पदव्युत्तर (इतर असल्यास नोंद करावे.) | |

**ग) गुणाची टक्केवारी :-**

| | प्रवेश वर्ष व दिनांक | उत्तीर्ण महिना व वर्ष | एकूण गुण | एकूण पैकी प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १० वी | | | | | |
| इयत्ता १२ वी | | | | | |
| पदवी | | | | | |

टिप: १) गुणांच्या ऐवजी ग्रेडेशन असल्यास ग्रेडेशन नुसार येणारी टक्केवारी द्यावी.
२) जे लागू नसेल ते खोडावे.

| | | |
|---|---|---|
| ह) | (i) अर्जदाराने अनु.जातीच्या विद्यार्थ्यांसाठी देय असणाऱ्या शिष्यवृत्ती/ शैक्षणिक परिक्षा फी योजनेचा लाभ घेतला आहे का? | होय / नाही |
| | (ii) घेतला असल्यास त्याचा यूजर आय.डी. क्रमांक | |

**अर्जदाराच्या पालकांची माहिती:**

| | |
|---|---|
| १) पालकांचे पुर्ण नाव | |
| २) पालकाचे अर्जदारांशी असलेले नाते | |
| ३) वडिल जिवीत नसल्यास त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी | |
| ४) पालकांचा व्यवसाय. | |
| ५) जेथे व्यवसाय करतात तेथील पत्रव्यवहाराचा पत्ता. | |
| ६) पालकांचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न.<br>(तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा जेथे सेवा करीत असतील तेथील कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेल्या वार्षिक वेतन प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.) | रुपये ...............................<br><br>वर्ष .................................. |

मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास किंवा माझ्या पाल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्यास सदर योजनेचा मिळत असलेला लाभ रदद होईल, याची तसेच अशा प्रकरणी सदर योजनेअंतर्गत माझ्या पाल्यास मिळालेली रक्कम १२टक्के व्याजासह मी शासनास परत करीन अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ: ................................

दिनांक: ..............................

साक्षीदार-

नांव: १) .................................. स्वाक्षरी .................

२) .................................. स्वाक्षरी .................

पालकाची स्वाक्षरी

## R.T.G.S. साठी विद्यार्थ्यांनी भरुन द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

| | | |
|---|---|---|
| **१.** | **विद्यार्थ्यांचे नांव (खाते पुस्तकानुसार)** | |
| २ | बँकेचे नांव | |
| ३ | शाखेचे ठिकाण | |
| ४ | बँक खाते क्रमांक | |
| ५ | IFSC CODE | |
| ६ | MICR CODE | |
| (सोबत :- बॅकेच्या खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स अथवा रद्द केलेला स्वाक्षांकित धनादेश जोडावा. | | |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जासाठी शैक्षणिक संस्थेने द्यावयाची माहिती

| | |
|---|---|
| अ) १) विद्यार्थ्याचे नाव | |
| २) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता | |
| ३) महाविद्यालय कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे | |
| ४) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व त्याचा कालावधी | |
| ५) महाविद्यालयास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | |
| ६) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ७) महाविद्यालय व्यवस्थापन प्रकार (शासकीय/शासन अनुदानित/खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यीत/ अभिमत इत्यादी नोंद करावी) | |
| ८) महाविद्यालयाचा ई-स्कॉलरशिपचा यूजर आय.डी. क्रमांक | |
| ९) विद्यार्थ्याचा प्रवेश नोंदणी क्रमांक / जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक | |
| **ब) विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची माहिती :-** | |
| (१) अभ्यासक्रमाचे नाव | |
| (२) प्रवेशित वर्ष | (पहिले/ दुसरे/ तिसरे) |
| (३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| (४) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| (५) व्यवसायिक/ बिगर व्यवसायिक/ उच्च माध्यमिक | |
| (६) प्रकार- (अनुदानित/ विनाअनुदानित) | |
| (७) अभ्यासक्रम- (पदवी/पदविका/ पदव्युत्तर) (इतर असल्यास नोंद करावी) | |



Govindzadkepatil/desktop.

| | |
|---|---|
| (८) आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जदाराने सादर केलेल्या गुणपत्रिकेनुसार त्यास इयत्ता १० वी / १२ वी/ पदवी परिक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी | इयत्ता १० वी चे गुण ................ टक्केवारी ..........<br>इयत्ता १२ वी चे गुण ................. टक्केवारी .........<br>पदवीचे गुण ........................... टक्केवारी ......... |
| (९) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयामार्फत आणखी कोणत्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केला आहे. | |
| (१०) अर्जदाराने आपल्या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी कोणत्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेतले होते त्याची माहिती | |
| (११) अर्जदाराने कोणत्या कोट्यातून प्रवेश घेतला. ((मॅनेजमेंट कोटा, CAP, स्पॉन्सर्ड कोटा, मायनॉरीटी, FWS (Fee Waiver Scheme), इतर (नमूद करणे)) | |

स्थळ: ..............................

दिनांक : ...........................                शिक्का

मुख्याध्यापक/ प्राचार्य यांची स्वाक्षरी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जासाठीसोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात**
**( मुळ प्रमाणपत्र जोडू नये )**

| | |
|---|---|
| १) जातीचा दाखला | होय / नाही |
| २) महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा ( वय /अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / रेशन कार्ड / निवडणूक ओळखपत्र /जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक ) | होय / नाही |
| ३) आधार कार्डाची प्रत | होय / नाही |
| ४) बॅकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणून पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बॅक स्टेटमेंटची प्रत किंवा रद्द केलेला चेक. | होय / नाही |
| ५) तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा वडील नौकरीत असल्यास फॉर्म नंबर१६ | होय / नाही |
| ६) विद्यार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| ७) इ. १० वी, १२ वी किंवा पदवी परिक्षेचे गुणपत्रक | होय / नाही |
| ८) महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट | होय / नाही |
| ९) विद्यार्थीनी विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा | होय / नाही |
| १०) बॅक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | होय / नाही |
| ११) विद्यार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र | होय / नाही |
| १२) स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| १३) विद्यार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा ( खाजगी वसतिगृह, भाडे करारनामा इ.) | होय / नाही |
| १४) महाविद्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र | होय / नाही |
| १५) सत्र परिक्षेच्या निकालाची प्रत | होय / नाही |

अर्जदाराची स्वाक्षरी

व पुर्ण नाव ............................................